महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ २२ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १४७ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# राज ठाकरेंसाठी शरद पवार सकारात्मक ?

**दै.ठाणेजीवनदीपवार्ता**

**मुंबई महापालिका निवडणूक ही प्रचंड प्रतिष्ठेची असणार आहे. या निवडणुकीत दोन्ही ठाकरे बंधू एकत्र लढण्याची शक्यता आहे. पण काँग्रेसने स्वतंत्र लढण्याची भूमिका घेतली आहे. असं असलं तरी शरद पवार हे ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्यावर सकारात्मक असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे भाजपसाठी हा मोठा धक्का आहे. कारण विरोधकांची एकजूट झाली तर भाजपसह महायुतीला मुंबईत मोठं आव्हान असणार आहे.**

**मुंबई महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. काँग्रेसने स्वतंत्र निवडणूक लढण्याची भूमिका घेतली आहे. तर दुसरीकडे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे एकत्र येताना दिसत आहेत. आगामी महापालिका निवडणुकीत ठाकरे बंधूंची युती होताना दिसण्याची शक्यता आहे. पण राज ठाकरे यांना सोबत घेणं हे काँग्रेसच्या काही नेत्यांना मान्य नाही.**



काँग्रेसने याआधीच स्वतंत्र निवडणुकीची घोषणा केली होती. पण दोन दिवसांपूर्वी वेगळ्या घडामोडी घडल्या. त्यामुळे आता आगामी काळात महाविकास आघाडीत डॅमेज कंट्रोल होण्याची शक्यता असल्याची चर्चा आहे. काँग्रेसच्या मुंबईतील नेत्यांच्या शिष्टमंडळाने दोन दिवसांपूर्वी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची त्यांच्या मुंबईतील निवासस्थानी जावून भेट घेतली. यावेळी काँग्रेस नेत्यांनी मुंबई महापालिका निवडणुकांसाठी शरद पवारांना युतीचा प्रस्ताव दिला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार आणि काँग्रेस पक्षाची अनेक वर्षांपासूनची नैसर्गिक युती राहिलेली आहे. त्यामुळे मुंबई महापालिका निवडणुका एकत्र लढण्यासाठी आघाडीचा आपण प्रस्ताव दिल्याचं काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी सांगितलं होतं.

तर शरद पवारांनी दोन दिवसांत काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांशी याबाबत चर्चा करु, असं काँग्रेसच्या शिष्टमंडळाला सांगितलं होतं. या सगळ्या घडामोडींनंतर आता सूत्रांकडून शरद पवार यांची भूमिका समोर येत आहे. महाविकास आघाडीमध्ये राज ठाकरे यांना सामावून घेण्यासाठी शरद पवार आग्रही असल्याची माहिती आहे.

### सत्तेच्या मोर्चात एकत्र येता, मग निवडणुकीत का नको?

सत्तेच्या मोर्चात एकत्र येता, मग निवडणुकीत का नको? अशी शरद पवारांची भूमिका आहे. त्यांनी काँगेसलाही हा मेसेज दिल्याची सूत्रांची माहिती आहे. ज्या प्रमाणे शरद पवार राज ठाकरेंसाठी आग्रही आहेत, तसेच उद्धव ठाकरेदेखील आग्रही आहेत. मात्र अद्याच राज ठाकरेंनी कोणतीही भूमिका जाहीर केलेली नाही. आगामी पालिका निवडणुकीसाठी ठाकरे बंधू आणि मनसेची युती होण्याची शक्यता आहे आणि अशातच आता पवारदेखील या युतीसाठी आग्रही असल्याची माहिती आहे.



### शरद पवारांचा काँग्रेस नेत्यांना फोन

**शरद पवार यांनी काँग्रेस नेत्यांना फोन करून मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या रणनीतीवर चर्चा केल्याचं कळतंय. काँग्रेस नेत्यांनी दोन दिवसांपूर्वी पवारांची भेट घेऊन आघाडीत निवडणूक लढविण्यास हिरवा कंदील दिला होता. मात्र ही आघाडी केवळ काँग्रेस-राष्ट्रवादी शरद पवारांच असेल का? असा प्रश्न उपस्थित झाला.**

**मनसेला सोबत घेऊन महाविकास आघाडी व्हावी, यासाठी शरद पवार हे पुढाकार घेताना दिसून येत आहेत. भाजपसोबत लढायचं असेल तर मनसेला सोबत घेऊन ही लढाई लढली पाहिजे, असं प्रमुख नेत्यांचं मत आहे. येत्या काही दिवसांमध्ये काही महाविकास आघाडीच्या बैठका होणार आहेत, त्यानंतर आघाडीबाबत काय होतं, हे लक्षात येईल. या विषयावरती आता सगळेच पक्ष, विशेषतः काँग्रेस काय भूमिका मांडते हे पाहणं अतिशय महत्त्वाचं असेल.**

## लक्षवेधी

### टिटवाळा परिसरात बेसुमार बेकायदा बांधकामे



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : यापूर्वी सतत कारवाई करून फेरीवाला मुक्त करण्यात आलेला टिटवाळा रेल्वे स्थानक परिसर गेल्या काही दिवसांपासून पुन्हा फेरीवाल्यांच्या विळख्यात अडकला आहे. त्यामुळे रेल्वे स्थानकात जाणारे प्रवासी, परिसरातील इमारतींमधील रहिवासी त्रस्त आहेत. अ प्रभागातील अधिकारी बदलल्यापासून टिटवाळा परिसरात बेसुमार बेकायदा बांधकामे आणि फेरीवाल्यांचा उपद्रव सुरू झाल्याने आयुक्त, अतिक्रमण नियंत्रण उपायुक्तांनी या प्रभागाकडे लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

टिटवाळा पूर्व भागात प्रसिध्द श्री सिध्दीविनायक मंदिर आहे. शेकडो भाविक दररोज याठिकाणी दर्शनासाठी येतात. टिटवाळा रेल्वे स्थानकातून पूर्व भागात बाहेर पडल्यावर रिक्षा वाहनतळ आहे. या वाहनतळाच्या चारही बाजुचे रस्ते, पदपथावर भाजीपाला, फळ विक्रेते, घरगुती किरकोळ वस्तू विक्रेते यांनी पुन्हा डेरा टाकला आहे. फेरीवाल्यांनी हातगाड्या लावून रस्ते अडवून ठेवले आहे. रेल्वे स्थानकाकडून सिध्दीविनायक मंदिर किंवा परिसरात जाण्यासाठी रिक्षा चालकांना कोंडीतून वाट काढत कसरत करावी लागते.



### डोंबिवलीतील राघो हाईट्स इमारतीवर पालिकेचा हातोडा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली** : बनावट सातबारा उतारा तयार करून, कल्याण डोंबिवली पालिकेच्या बनावट बांधकामांच्या आधारे उभारण्यात आलेल्या डोंबिवली पूर्व आयरे गावातील राघो हाईट्स या सहा मजली बेकायदा इमारतीवर शुक्रवारी पालिकेच्या ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त भारत पवार यांच्या पुढाकाराने तोडकाम पथकाने हातोडा मारून ही इमारत जमीनदोस्त करण्याची कारवाई सुरू केली. या कारवाईमुळे भूमाफियांना मोठा दणका बसला आहे.

या बेकायदा इमारतीवर कारवाई करावी म्हणून गेल्या दीड वर्षापासून तक्रारदार उज्वला पाटील पालिकेत पाठपुरावा करत होत्या. ही इमारत तोडण्यासाठी यापूर्वी दोन वेळा पोलीस बंदोबस्त मिळुनही पालिकेने कारवाई केली नव्हती. तक्रारदार उज्वला पाटील मात्र राघो हाईट्स बेकायदा इमारत जमीनदोस्त केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा पवित्रा घेऊन पालिका, पोलिसांकडे पाठपुरावा करत होत्या.

### आंबेडकरी स्त्री संघटनतर्फे संविधान महोत्सव-जागृती परिषद

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : भारतीय संविधानाला यंदा ७५ वर्षे पूर्ण होत असून, त्यानिमित्ताने प्रत्येक नागरिकांमध्ये भारतीय संविधानाची जनजागृती व्हावी व संविधानाची मूल्ये कळावी याकरिता आंबेडकरी स्त्री संघटनेने संविधान महोत्सव-जागृती परिषदेचे आयोजन केले आहे. मंगळवारी (ता. २५) आंबेडकर भवन येथे सकाळी १० ते सायंकाळी ६ या कालावधीत कार्यक्रम होणार आहे. या परिषदेच्या निमंत्रक संघटना संस्थापक प्रा. आशालता कांबळे आहेत, तर या कार्यक्रमाचे उद्घाटन अभिनेता, कवी डॉ. मिलिंद शिंदे करणार असून, अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्त्या डॉ. प्रज्ञा पवार असतील. या वेळी टॉक शो होणार असून, त्यात सुनील खोब्रागडे, राही भिडे, चयनिका शाह, डॉ. कुंदा प्र. नि., हसीना खान यांचा सहभाग असणार आहे, तर समारोपप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून विचारवंत प्रा. डॉ. राम पुनियानी असणार आहेत. या कार्यक्रमासाठी सर्वांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## बदलापूर : उमेदवारांच्या प्रचारार्थ आ.किसन कथोरे यांची तुलसी विहार सोसायटीला भेट



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूर** : कुळगाव बदलापूर नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्ष पदाच्या व प्रभाग क्रमांक ०३ च्या अधिकृत उमेदवार सौ.रुचिता राजेंद्र घोरपडे आणि श्री.शरद सुभाष तेली यांच्या प्रचारार्थ मोहन तुलसी विहार सोसायटीला भेट दिली. येथील नागरिकांची भेट घेऊन सर्वांशी संवाद साधला.

## अंबरनाथमध्ये भीषण अपघात


**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ शहरात अपघाताची मोठी दुर्घटना घडली आहे. अंबरनाथ पूर्व आणि पश्चिम भागाला जोडणाऱ्या पुलावर ही अपघाताची मोठी दुर्घटना घडली आहे. एका भरधाव चारचाकीने अनेक वाहनांना धडक दिली. या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर अनेक जण जखमी झाले आहेत. या घटनेत परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत.

अंबनाथ पूर्व आणि पश्चिमेला जोडणाऱ्या उड्डाणपुलार वाहतूक कोंडी झाली होती. हुतात्मा चौकाहून निघालेली एक चारचाकी अंबरनाथ पश्चिमेकडे जात होती.

### समोरुन येणाऱ्या चारचाकीने अनेक दुचाकींना उडवलं

यावेळी कार अत्यंत वेगात होती. त्यामुळे चालकाचा गाडीवरील ताबा सुटला. या चारचाकी गाडीने अनेक वाहनांना धडक दिली. ही धडक इतकी मोठी होती की एकजण थेट ब्रिजच्या खाली जावून कोसळला. तर काही जण ब्रिजवरती कोसळले. तसेच दुचाकीदेखील खाली कोसळल्याची माहिती आहे. यामुळे काही जण जखमी झाल्याची माहिती आहे. पोलीस सध्या घटनेचा सखोल तपास करत आहेत.



## केडीएमसीतील प्रलंबित कामांबाबत खा. बाळ्यामामांनी घेतली आयुक्तांची भेट




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण परिसरातील नागरिकांच्या सोयी-सुविधा, प्रलंबित विकासकामे आणि पायाभूत सुविधा विषयक मुद्द्यांवर खा. बाळयामामांनी आयुक्तांची भेट घेतली. या वेळी आयुक्तांसोबत सविस्तर चर्चा झाली. प्रलंबित कामांना लवकर गती मिळावी यासाठी आवश्यक त्या विनंत्या देखील करण्यात आल्या. यावेळी आयुक्त साहेबांनीही अतिशय सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित विभागांना तातडीने पुढील कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.







## प्रोस्टेट ग्रंथी वाढीच्या आजाराबाबत छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात जनजागृती शिबीर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : प्रोस्टेट ग्रंथी वाढीचा आजार हा वाढत्या वयानुसार पुरूषांमध्ये जास्त प्रमाणात पहावयास मिळतो. या आजाराची लक्षणे मोठ्या प्रमाणात पन्नाशीच्या वरील पुरूषांमध्ये आढळून येतो. जागतिक पडताळणीमध्ये या वाढ झालेल्या प्रोस्टेट ग्रंथी मध्ये कर्करोगाचे प्रमाण लक्षणीय असल्याचे आढळून आले आहे, प्रोस्टेट ग्रंथीच्या वाढीवर रोबोटिक साधनाच्या माध्यमातून शस्त्रक्रिया करणे सुलभ असल्याचे युरॉलॉजिस्ट डॉ. हर्षवर्धन गोडबोले यांनी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात आयोजित शिबीरात व्यक्त केले. या कार्यक्रमास



ज्येष्ठ अभिनेते डॉ. गिरीष ओक, ज्येष्ठ पत्रकार मिलिंद बल्लाळ रुग्णालयाच्या अधिष्टांत्री डॉ. स्वप्नाली कदम तसेच ऑपथल विभागाचे प्रमुख डॉ. राकेश बारोट आदी उपस्थित होते.

स्तुत्य उपक्रम- अभिनेते गिरीष ओक प्रोस्टेट ग्रंथीचा आजाराचे प्रमाण हे पुरूषांमध्ये जास्त असल्याचे दिसून येते. या आजारावर वेळीच उपचार घेणे गरजेचे असून छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाने नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्या दृष्टीने अशा प्रकारच्या शिबीराचे आयोजन केले हा अत्यंत स्तुत्य उपक्रम असल्याचे प्रतिपादन अभिनेते डॉ.गिरीष ओक यांनी केले. तर ज्येष्ठ पत्रकार मिलिंद बल्लाळ यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले.



## संपादकीय

# आरक्षण आणि निवडणुका


आरक्षणाचा प्रश्न हा भारताच्या सामाजिक-राजकीय जीवनातील सर्वात संवेदनशील आणि महत्त्वाचा मुद्दा आहे. निवडणुका जवळ आल्या की हा विषय अधिकच तापतो. कारण आरक्षण हे फक्त धोरण नसून, समाजातील वंचित घटकांच्या हक्कांशी आणि संधी-समानतेशी जोडलेला भावनिक मुद्दा आहे. त्यामुळे कोणताही राजकीय पक्ष हा विषय हाताळताना अतिशय सावध पवित्रा घेतो—पण तेवढ्याच कौशल्याने मतदारांची मने जिंकण्याचा प्रयत्नही करतो.

निवडणूक काळात आरक्षणाचा मुद्दा अनेक प्रकारे पुढे येतो. काही पक्ष वाढीव आरक्षणाची मागणी उचलून धरतात, तर काही 'मेरिट'चा मुद्दा पुढे करून आरक्षणाचा पुनर्विचार करण्याची भाषा करतात. राज्यांच्या पातळीवर मराठा, धनगर, ओबीसी, मुस्लीम, किंवा इतर मागासवर्गांबाबतचे प्रश्न पुन्हा पुन्हा डोकावतात. अशा वेळी नेमके काय करायचे यावर राजकीय पक्षांमध्ये मतभेद स्पष्ट दिसतात.

परंतु या वादात सर्वात महत्त्वाचा प्रश्न एकच राहतो—आरक्षणाचा खरा हेतू विसरला जात नाही ना? हे धोरण सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी, वंचितांना शिक्षण आणि नोकरीत संधी देण्यासाठी अस्तित्वात आले. वेळोवेळी केलेल्या सुधारणा, समित्या, आयोग यांच्या अहवालांतही हेच स्पष्ट दिसते. पण निवडणुकांच्या रणधुमाळीत हा हेतू बाजूला पडून, आरक्षण हे फक्त मतपेट्या भरण्याचे साधन बनते, हीच सध्याची चिंतेची बाब आहे.

आजची सर्वात मोठी गरज म्हणजे आरक्षणाबाबतचा संवाद प्रामाणिक आणि तथ्याधारित असणे. आरक्षण वाढवावे, बदलावे की पुनर्रचना करावी—या सर्व चर्चा समाजशास्त्रीय आणि आर्थिक अभ्यासाच्या आधारावर व्हायला हव्यात. एका वर्गाला दिलेले लाभ दुसऱ्यांच्या नाराजीचे कारण होणार नाहीत, याचीही जबाबदारी शासनाची आहे.

निवडणूक संपल्यावर आरक्षणाचा मुद्दा पुन्हा चर्चेबाहेर जातो, हे चित्र बदलायला हवे. आरक्षणाची शाश्वत आणि न्याय्य रचना तयार करणे ही धोरणकर्त्यांची जबाबदारी आहे. अन्यथा, हा विषय पुढेही केवळ घोषणाबाजीचा आणि राजकीय ध्रुवीकरणाचा मुद्दा राहील. लोकशाही मजबूत तेव्हाच होईल, जेव्हा आरक्षणाचा प्रश्न राजकीयहेतूपेक्षा सामाजिक न्यायाच्या दृष्टीने प्रामाणिकपणे हाताळला जाईल.



# ठाकुर्ली रेल्वे फाटक ते म्हसोबा चौक उन्नत मार्गाची उभारणी होणार

## एमएमआरडीएकडून ३६ कोटींची निविदा जाहीर

### खासदार श्रीकांत शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील ठाकुर्ली रेल्वे फाटक ते म्हसोबा चौकापर्यंत उर्वरित उन्नत मार्ग बांधणे व १५ मी. रुंद रस्ता विकसित करण्यात येणार आहे. या मार्गाच्या उभारणीसाठीचा एकूण खर्च हा ६०.५३ कोटी रुपये इतका आहे. यातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वतीने ३६ कोटी रुपयांची निविदा जाहीर करण्यात आली असून लवकरच या मार्गाच्या प्रत्यक्ष उभारणीचे काम सुरु होणार आहे. खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी यासाठी एएमआरडीएकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून दीर्घ काळ प्रलंबित असलेल्या या प्रकल्पाला गती मिळाली आहे. यासाठी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहेत.

खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने आणि संकल्पनेतून कल्याण लोकसभा मतदारसंघात अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागले आहेत. मतदारसंघातील रस्त्यांचे काँक्रीटीकरण, कल्याण शिळफाटा रस्ता, पलावा उड्डाणपूल, मुंब्रा वाय जंक्शन, कल्याण रिंग रोड, मोठागाव माणकोली उड्डाणपूल यांसारख्या अनेक महत्वाकांक्षी प्रकल्पांमुळे मतदारसंघात वाहतुकीला वेग मिळाला आहे. याच पार्श्वभूमीवर कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील ठाकुर्ली रेल्वे फाटक ते म्हसोबा चौकापर्यंत उर्वरित उन्नत मार्ग बांधणे व १५ मी. रुंद रस्ता विकसित करण्यात येणार आहे. या मार्गाच्या उभारणीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वतीने ३६ कोटी रुपयांची निविदा जाहीर करण्यात आली आहे.

ठाकुर्ली लेव्हल क्रॉसिंग ते मानपाडा चौकादरम्यानच्या उन्नत रस्त्याचे बांधकाम आणि १५ मीटर रुंदीच्या जोडरस्त्यांचा विकास या प्रकल्पामध्ये करण्यात येणार आहे. परिसरातील वाढत्या लोकसंख्येमुळे वाहतुकीवरील ताण, प्रवासातील विलंब, तसेच अपघाताचा धोका कमी करण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. ठाकुर्ली, मानपाडा, डोंबिवली परिसरातील नागरिकांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि जलद वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी हा प्रकल्प निर्णायक ठरणार असून, स्थानिक भागातील वाहतूक जलदगतीने होण्यास हा प्रकल्प महत्वाचा ठरणार आहे.

या प्रकल्पाच्या टप्प्यात अनेक घरे येत असून त्यांचे तोडकाम करण्यात येणार आहे. तर यातील बाधित कुटुंबांचे योग्य पद्धतीने पुनर्वसन करण्यात येणार आहे. या सर्व कुटुंबियांना बीएसयुपी योजनेतील घरे देण्यात येणार आहेत. याबाबत प्रक्रिया देखील जलदगतीने राबविण्यात येत आहे.

### कविवर्य नारायण सुर्वे यांच्या 'जन्मशताब्दी'निमित्त

# ठाण्यात "साहित्य विचार जागर" कार्यक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : 'कामगार-कवी' अशी सर्वमान्य ओळख असलेले पद्मश्री नारायण सुर्वे यांच्या 'जन्मशताब्दी'निमित्त, दि. २२ नोव्हेंबर-२०२५ रोजी, सायंकाळी ५ वाजता, ठाण्यातील मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सभागृहात "साहित्य विचार जागर" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमात प्रज्ञा पवार, नीरजा, छाया कोरेगांवकर, कविता मोरवणकर, सुरेखा पैठणे, अनिता भारती, बबन सरवदे, शिवा इंगोले, शिवराम सुखी आदी मान्यवर कवी, आपली एक आणि नारायण सुर्वे यांची एक, अशा प्रत्येकी दोन कविता सादर करणार असल्याची माहिती, 'कामगार-कवी नारायण सुर्वे जन्मशताब्दी महोत्सव समिती'चे अध्यक्ष व ज्येष्ठ कामगार-नेते राजन राजे यांनी पत्रकार परिषदेत दिली. 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'च्या कार्यालयात, मंगळवारी (दि. १८ नोव्हेंबर-२०२५) पार पडलेल्या या पत्रकार परिषदेत, समितीचे निमंत्रक कॉ. उदय चौधरी, ॲड. नाना अहिरे, कॉ. अविनाश कदम, आंबेडकरी विचारवंत आनंदा होवाळ, आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. दरम्यान, दि. २२ नोव्हेंबर-२०२५ रोजी, होणाऱ्या कविवर्य नारायण सुर्वे यांच्या, "साहित्य विचार जागर" या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी अरुण म्हात्रे करणार असून, 'महाराष्ट्र राज्य लाल बावटा शेतमजूर युनियन'चे कार्याध्यक्ष कॉ. राम बाहेती यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तर, 'नारायण सुर्वे यांच्या कविता आणि विचार' या विषयावर, ज्येष्ठ आंबेडकरवादी विचारवंत अर्जुन डांगळे हे, आपले मनोगत व्यक्त करणार आहेत. यावेळी एका लघुपटाच्या माध्यमातून, कविवर्य नारायण सुर्वे यांचा जीवनपट उलगडून दाखविण्यात येणार असल्याची माहिती, समितीचे अध्यक्ष व ज्येष्ठ कामगार-नेते, राजन राजे यांनी पत्रकार परिषदेत शेवटी दिली.

# क्रीडा व युवक कल्याण विभागामार्फत ग्लोबल युथ फेस्टिव्हल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : शहरातील तरूणांसाठी 6 आणि 7 डिसेंबर रोजी जिओ वर्ल्ड गार्डन, वांद्रे येथे क्रीडा व युवक कल्याण विभागामार्फत श्रीमद राजचंद्र मिशन यांच्या सहकार्याने ग्लोबल युथ फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड.माणिकराव कोकाटे यांच्या उपस्थितीत हा सोहळा होणार आहे. यामध्ये १०,००० पेक्षा जास्त तरुण मन:शांती, ॲडव्हेंचर, आर्ट्स, कल्चर, संगीत, योग-ध्यान, समाजाभिमुख उपक्रम आणि (स्किल-बिल्डिंग) कौशल्य विकास यांसारख्या अनोख्या उपक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत.

क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या सहकार्याने, हा देशातील आघाडीचा युवक उत्सव ठरणार आहे. आत्मपरिवर्तनातून समाजपरिवर्तन घडवण्यासाठी हा उत्सव तरुणांची चळवळ म्हणून उभी राहील.

लंडन आणि पुण्यासारख्या शहरानंतर ग्लोबल यूथ फेस्टिव्हल या वर्षी मुंबई येथे आयोजित करण्यात येत आहे. ग्लोबल यूथ कम्युनिटी ही २० पेक्षा जास्त देशांमध्ये आणि 170 पेक्षा जास्त शहरांमध्ये पसरलेली तरुणांची एक प्रेरणादायी चळवळ आहे. क्रिएटर्स, व्यावसायिक, कलाकार, उद्योजक आणि चेंजमेकर यांनी एकत्रित येऊन ग्लोबल यूथ कमिटी तयार केली आहे.

हजारो लोकांना एकत्र आणणारे सायकलथॉनसारखे उपक्रम, ग्रामीण विकासासाठी केलेले अनेक प्रकल्प, आरोग्य, प्राणी-कल्याण, शिक्षण यांसाठी उभारलेले उपक्रम यामुळे हा उत्सव केवळ मनोरंजन नसून प्रभाव आणि परिवर्तनाचा उत्सव ठरणार आहे.

संगीत किंवा कला अशा एखाद्या विषयापुरते मर्यादित न राहता, ग्लोबल युथ फेस्टिवल हा समग्र अनुभव देणारा उत्सव आहे. महिला सक्षमीकरण, बालशिक्षण, ग्रामीण विकास, प्राणी-कल्याण, पर्यावरण संवर्धन यांसारख्या समाजोपयोगी उपक्रमांचे प्रात्यक्षिक देशातील सर्वात मोठा आऊटडोअर साउंड हीलिंग अनुभव, संगीत, कला, ध्यान, जर्नलिंग, पॉटरी, ड्रम सर्कल अशा मजेशीर पॉप-अप ॲक्टिव्हिटीज यांचा समावेश असणार आहे. अधिक माहितीसाठी youthfestival.srmd.org येथे भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# ॲसिडिटीच्या औषधांमध्ये निघाल्या आळ्या

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याणमध्ये एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ॲसिडिटीच्या त्रासासाठी दिलेल्या गोळ्या घेताना त्या गोळ्यांमध्ये आळ्या असल्याचे समोर आल्यानंतर सायली पनवेलकर या महिला रुग्णासह संबंधित डॉक्टरही हादरले आहेत. सायली पनवेलकर यांनी ॲसिडिटीवर उपचारासाठी डॉ. केदार भिडे यांना भेट दिली होती. त्यांनी दिलेल्या औषधाच्या स्ट्रिपमधील एका गोळीमध्ये आळ्या दिसताच पनवेलकर यांचा थक्क उडाला. हा प्रकार पाहताच स्वतः डॉक्टरही अवाक झाले असल्याची माहिती डॉ. भिडे यांनी दिली.



कल्याण पश्चिमेतील प्रथमेश इमारती राहणाऱ्या सायली पनवेलकर यांचा खांदा दुखत होता. त्यांची मुलगी मानसी राणे या त्यांच्या आई सायली यांना डॉक्टर केदार यांच्याकडे उपचारासाठी घेवून गेल्या. डॉक्टरांनी त्यांना गोळ्या दिल्या. त्या गोळ्यामध्ये ॲसिडिटीवर ओमे कॅप-20 ही गोळी देखील होती. सायली यांनी गोळ्या खाण्यासाठी घेतल्या. तेव्हा त्या गोळ्या काळपट असल्याचे दिसून आले. त्यांना थोडं वेगळं वाटलं. गोळ्या अशा का असा त्यांना संशय आला.


### महिला रुग्ण हादरली

### डॉक्टरही थक्क

त्यांनी त्या गोळ्या निरखून पाहिल्या. त्यावेळी त्यांना त्या गोळ्यात आळ्या दिसून आल्या. हे पाहून सायली आणि त्यांची मुलगी मानसी यांना धक्का बसला. गोळ्यांच्यीपाकिटावर गोळ्यांची मॅन्युफॅक्चर डेट ही 2025 सालची होती. त्या गोळ्यांची मुदत 2027 साल पर्यंत असल्याचं ही त्यावर नमूद करण्यात आलं होतं. मुदत संपलेली नसताना गोळ्या काळपट आणि त्यात आळ्या कशा काय आढळून आल्या असा प्रश्न त्यांना पडला. हा प्रकार एखाद्या रुग्णांच्या जिविताशी खेळण्याचा आहे. त्यामुळे गोळ्यांच्या कंपनी विरोधात कारवाई झाली पाहिजे अशी मागणी सायली यांची मुलगी मानसी यांनी केली आहे.

मानसी यांनी आईसोबत डॉक्टर भिडे यांच्याकडे धाव घेतली. हा प्रकार ऐकताच डॉक्टर भिडे यांनाही धक्का बसला. असा प्रकार अन्य कोणा सोबत होऊ नये. यासाठी डॉक्टर भिडे यांनी तातडीने प्राईड हेल्थ केअरशी संपर्क साधला. त्यांना घडला प्रकार सांगितला. त्यांना या बाबत पूर्ण कल्पना दिली. या प्रकरणी गोळ्यांची कंपनी रोनपोली यांच्याकडे संपर्क साधून घडला प्रकार त्यांच्या निदर्शनास आणला. त्यांना आळ्या आढळून आलेल्या गोळ्या पाठवून द्या. कंपनीने दाद दिली नाही तर या प्रकरणात ग्राहक न्यायालयाकडे दाद मागण्यात येईल असे डॉक्टर भिडे यांनी सांगितले.

# प्रा. कैलास कळकटे यांना पीएच.डी प्रदान



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : जीवनदीप महाविद्यालय खर्डीचे प्र.प्राचार्य प्रा कैलास कळकटे यांना नुकतीच मराठी विषयात पीएच.डी ही पदवी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने प्रदान करण्यात आली आहे. डॉ. कळकटे यांनी मराठी विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. सतीश बडवे यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वातंत्र्योत्तर मराठी कथेतील स्थित्यंतरे' या विषयावर शोध प्रबंध सादर केला. या शोध प्रबंधास विद्यापीठाने मान्यता देत पीएचडी ही शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदवी प्रदान केली आहे. डॉ. कळकटे यांच्या या यशाबद्दल जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष श्री रविंद्र घोडविंदे, प्राचार्य अशोक वाघ, अनिल घोडविंदे, नरेश जाधव, भगवान मोकाशी, प्रशांत खर्डीकर, लवेश वाघ, महाविद्यालयतील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे.

# अपंग विकास महासंघाचे बेमुदत धरणे आंदोलन

## दिव्यांग स्टॉलवर कारवाई केल्याने आंदोलन




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पश्चिमेतील लालचौकी परिसरात असलेल्या दिव्यांग स्टॉलवर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने कारवाई केल्याने अपंग विकास महासंघाने केडीएमसी मुख्यालयाबाहेर बेमुदत धरणे आंदोलन सुरु केले आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने २००८ साली लक्ष्मण मोरे यांना लालचौकी परिसरात दिव्यांग स्टॉलची परवानगी दिली आहे. असे असतांना कुठलीही पूर्वसूचना न देता प्रभाग अधिकारी धनंजय थोरात यांनी या दिव्यांग स्टॉलवर कारवाई करत तोडले आहे. यामुळे दिव्यांग लक्ष्मण मोरे यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असून याप्रकरणी दोषी असणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या विरोधात बेमुदत धरणे आंदोलन करत असल्याची माहिती अपंग विकास महासंघाचे अध्यक्ष अशोक भोईर यांनी दिली.






# जन आरोग्य योजना सर्वांसाठीच ठरणार जीवनदायी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड** : राज्यातील सर्व शासकीय निमशासकीय अधिकारी कर्मचारी तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांना एकत्रित आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा फुले जन आरोग्य योजना या दोन्ही योजनांच्या माध्यमातून दरवर्षी पाच लाखा रुपये पर्यंतचा मोफत उपचाराचा लाभ मिळणार आहे. जिल्हा परिषद पंचायत समिती महसूल आणि नगरपरिषदासह सर्वत्र सर्वच यंत्रणांनी आयुष्यमान कार्ड काढण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्यभरातील शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांना, अधिकाऱ्यांना यादीत समाविष्ट करण्याच्या सूचना आहे. त्यानुसार तातडीने कर्मचाऱ्यांच्या याद्या तयार करणे बाबत आरोग्य विभागाला निर्देश मिळाले आहेत. त्यासाठी ऑनलाईन अथवा कॅम्प लावून प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना आहेत. योजनांमध्ये या आजारावर होणार मोफत उपचार या आरोग्य योजनेअंतर्गत गंभीर ते सामान्य अशा 1 हजार 300 हून अधिक प्रकारच्या आजारावर आणि शस्त्रक्रियांचा उपचाराचा समावेश आहे. यात हृदयविकार, कर्करोग, मूत्रपिंड प्रत्यारोपण, गुडघा बदलणे अशा मोठ्या शस्त्रक्रियांचा समावेश आहे. त्यामुळे गंभीर स्वरूपाच्या मोठ्या आजारावर सहज उपचार करता येणार आहे. त्यात होणारा आर्थिक खर्च टाळता येणार आहे.

जिल्हा परिषद पंचायत समिती नगर परिषद ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना लाभ

राज्यातील महसूल, नगरपरिषद, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत या ठिकाणच्या कर्मचाऱ्यांना उपचारासाठीचा मोठा खर्च टाळता येणार आहे. एकत्रित योजनेमुळे या कर्मचाऱ्यांना 5 लाख रुपयांच्या आरोग्य खर्चाची चिंता मिटणार आहे. यासाठी कर्मचारी राज्यातील रहिवासी असावा लागणार आहे यासोबतच त्यांच्याकडे रेशनकार्ड असणे आवश्यक आहे.

आता बिलाची चिंता मिटली

कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या मोठ्या आणि गंभीर आजारावर उपचार करताना येणाऱ्या हॉस्पिटल बिलाची चिंता मिटणार आहे. 5 लाखापर्यंतचा उपचार खर्च पूर्णपणे सरकार उचलणार आहे. त्यामुळे रुग्णावर उपचार करण्यासाठी कर्ज काढण्याची अथवा आर्थिक तडजोड करण्याची वेळ येणार नाही. आरोग्य विभागाच्या नव्या निर्णयाने कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

कंत्राटी कर्मचाऱ्यांनाही मिळाला दिलासा : मोठा संघर्ष करूनही आरोग्य विम्यापासून वंचित राहिलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी हा निर्णय आता महत्वाचा ठरला आहे. या योजनेत कंत्राटी कर्मचाऱ्यांचा आणि त्यांच्या कुटुंबीयांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्या आरोग्याच्या गरजेच्या वेळी मोठ्या रुग्णालयामध्ये मोफत उपचार घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यातून त्यांना आर्थिक आणि मानसिक आधार मिळणार आहे. हे योजना कर्मचाऱ्यांसाठी दिलासा देणारी आहे.

आयुष्यमान भारतकार्ड काढण्याच्या सूचना योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रत्येक कर्मचारी व त्याच्या कुटुंबातील सदस्यांचे आयुष्यमान कार्ड अनिवार्य आहे. त्यामुळे या सरकारी यंत्रणाना शिबिर घेऊन किंवा ऑनलाइन पद्धतीने लवकरात लवकर आपली कार्ड तयार करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.आनंद गोसावी यांनी दिल्या आहेत.

# भविष्यवेध



शनिवार

२२ नोव्हेंबर २०२५

**मेष**
ऑफिसमध्ये फोनचा वापर कमीत कमी कराल आणि तुमच्या कामावर पूर्णपणे लक्ष केंद्रित कराल. आर्थिक बाबींमध्ये लोकांवर जास्त विश्वास ठेवणे टाळा.

**वृषभ**
पैसे उधार देण्यापूर्वी काळजीपूर्वक विचार करणे शहाणपणाचे ठरेल. आज तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत धार्मिक स्थळाला जाण्याची योजना आखू शकता.

**मिथुन**
योजनांनुसार पुढे जात असताना, तुमचे मन तुमच्या कामावर केंद्रित राहील. सामाजिक कार्यात आवड वाढू शकते. जोडीदाराकडून पूर्ण पाठिंबा मिळेल.

**कर्क**
व्यावसायिक भागीदारीमुळे फायदा होऊ शकतो व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी नवीन संधी मिळतील. एखाद्याला उधार दिलेले पैसे अचानक परत मिळू शकतात.

**सिंह**
नशीब मिळणे कठीण असू शकते. तुम्हाला कामावर काहीतरी चर्चा करावी लागू शकते आणि तुमचे शत्रू तुमच्या योजनांनी अधिक प्रभावित होऊ शकतात.

**कन्या**
मोठ्या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस खास आहे. आयुष्यातील कोणत्याही चालू समस्या लवकरच सोडवल्या जातील.

**तुळ**
कुटुंबात धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन केले जाऊ शकते. तुमचे जीवन सुधारण्यासाठी तुम्ही सकारात्मक बदल करण्याचा प्रयत्न कराल.

**वृश्चिक**
व्यावसायिक महत्त्वाच्या बैठकीला उपस्थित राहू शकतात. कर्जातून मुक्तता मिळेल आणि तणाव कमी होतील. चांगल्या ठिकाणी भेट देऊ शकता.

**धनु**
शत्रू तुमच्यापासून दूर राहण्याची शक्यता आहे. नियोजित कामे वेळेवर पूर्ण होण्याची अपेक्षा आहे आणि कामे वेळेपूर्वी पूर्ण केल्याबद्दल आनंद

**मकर**
होईल. आरोग्याच्या दृष्टीने, दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. जोडीदाराला प्रगतीची चांगली संधी मिळेल. कुरिअर व्यावसायिकांना आज फायदा होईल.

**कुंभ**
मेहनत आणि समर्पण पाहून तुमचे कनिष्ठ तुमच्याकडून काहीतरी नवीन शिकण्याचा प्रयत्न करतील. तुम्ही मित्रांसोबत घरी चित्रपट पाहण्याची योजना आखू शकता.

**मिन**
तुम्हाला अशा व्यक्तीची भेट होईल जी भविष्यात तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. तुम्हाला एखाद्या विशिष्ट कामात यश मिळेल.

# दिव्यात कचरा प्रश्न पेटला

## प्रभाग समिती कार्यालयाच्या दारात कचरा फेकत आंदोलन



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : दिवा शहरात जागोजागी कचरा साचल्याने आणि वेळेवर उचलला न गेल्याने सर्वत्र दुर्गंधी व अस्वच्छतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या गंभीर कचरा समस्येकडे प्रशासनाचे होत असलेल्या दुर्लक्षाविरोधात भारतीय जनता पार्टी (भाजप) आक्रमक झाली असून, भाजप कार्यकर्त्यांनी दिवा प्रभाग समिती कार्यालयाच्या दारात कचरा फेकून अनोखे आंदोलन केले. कळवा-मुंब्रा परिसरात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाने पालिका मुख्यालयाच्या गेटवर कचरा टाकून आंदोलन केल्यानंतर आता दिव्यातील कचरा कोंडीवरून भाजपनेही आक्रमक भूमिका घेतली आहे. गुरुवारी (ता. २०) भाजपने थेट दिवा प्रभाग समिती कार्यालयाच्या दारात कचरा फेकून तीव्र आंदोलन केले. यामुळे ठाणे पालिका क्षेत्रातील कचराप्रश्न पुन्हा एकदा पेटला आहे.

दिवा शहर परिसर, स्थानक परिसर आणि दिवा दातीवली रोडवर ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले आहेत. हा साचलेला कचरा सडून त्याला दुर्गंधी सुटल्यामुळे नागरिकांना नाक दाबून रस्त्यावरून जावे लागत आहे. नागरिकांनी या समस्येबाबत भाजप कार्यालयात तक्रारी केल्या होत्या. कचरा समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी भाजपने गुरुवारी हे आंदोलन केले. दिवा शहर मंडलाध्यक्ष सचिन भोईर यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले.

महिला मोर्चा अध्यक्षा सपना भगत, भाजपचे ठाणे शहर जिल्हा उपाध्यक्ष विजय अनंत भोईर, ठाणे जिल्हा कार्यकारिणी सदस्य रोशन भगत, अंकुश मढवी, प्रवीण पाटील, श्रीराम भगत, विजय वाघ, नितीन कोरगावकर, अनुराज पाटील, कल्पेश सारस्वत, साधना सिंह, पूनम सिंह, प्रवीण महाकाल आदींसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. त्यांनी दिवा विभागातील कचरा स्वतः गोळा करून तो थेट दिवा प्रभाग समितीमधील घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कार्यालयासमोर टाकून तीव्र निदर्शने केली.

## भिवंडीतील भरोडी बुलेट ट्रेन प्रकल्प संदर्भात

# शिवसेना जिल्हाप्रमुखांनी घेतली उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट

## समस्यांचे निराकरण करण्याचे प्रशासनाला दिले आदेश..



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या बुलेट ट्रेन रेल्वे प्रकल्प मार्ग भिवंडी तालुक्यातून जात आहे. बुलेट ट्रेन रेल्वे चे कारशेड भिवंडीतील अंजूर या परिसरात होत आहे.या प्रकल्पामुळे स्थानिक ग्रामस्थांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने त्याविरोधात ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात असुन भरोडी गांव परिसरातील शेकडो महिला,विद्यार्थी व नागरिक ग्रामस्थांनी या विरोधात आंदोलन छेडले असून भरोडी येथील बुलेट ट्रेनचे काम बंद करण्यासाठी साखळी उपोषण आंदोलन सुरू सुरू केले आहे त्यामुळे शिवसेनेचे ठाणे जिल्हाप्रमुख देवानंद थळे, भिवंडी चे ग्रामीण आमदार शांताराम मोरे यांनी आंदोलन घटनास्थळी धाव घेऊन आंदोलनकर्ते ग्रामस्थांची भेट घेऊन चर्चा करून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी ग्रामस्थांच्या समस्यांचे निराकरण करावे अशी मागणी केली आहे.त्यामुळे शिंदे यांनी तातडीने दखल घेत बुलेट प्रकल्प प्रशासनाला ग्रामस्थांची भेट घेऊन समस्यांचे निराकरण करण्याचे आदेश सुचना दिल्याचे थळे यांनी सांगितले.

भिवंडी तालुक्यात राबविण्यात येणाऱ्या बुलेट ट्रेन प्रकल्पामध्ये भरोडी येथील स्थानिक रहिवासी शेतकरी व नागरिक बाधित झाले आहेत.बुलेट ट्रेन कारशेड मुळे भरोडी येथील शेतकरी यांना आपल्या शेतावर जाण्यासाठी सहा किलोमीटर चा वळसा घालून जावा लागणार आहे.गांव परिसरातील रहिवासी विद्यार्थ्यांना अंजूर येथील शाळेत जाण्या साठी रस्ता न राहिल्याने त्यांना सुद्धा सहा किलोमीटरचा वळसा घालून खांद्यावर दप्तराचे ओझे घेऊन धोकादायक प्रवास करावा लागणार आहे.येथील शेतकरी व विद्यार्थी यांच्यासाठी भुयारी मार्ग उपलब्ध करून द्यावा या मागणी साठी ग्रामस्थांनी सरपंच विलास पाटील, उपसरपंच संगीता पाटील व इतर मान्यवर ग्रामस्थ शेतकऱ्यांनी साखळी आंदोलन उपोषण सुरू केले त्यामुळे भिवंडी ग्रामीण चे आमदार शांताराम मोरे व शिवसेनेचे ठाणे जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांनी आंदोलनस्थळी धाव घेऊन ग्रामस्थांची भेट घेऊन त्यांच्या समस्यां बाबतीत चर्चा करून थेट राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन बुलेट ट्रेन प्रकल्प व ग्रामस्थांना भेडसावणाऱ्या समस्यांची माहिती देऊन निराकरण करण्याची मागणी केली.

भरोडी गावातील बरीच शेती ही खाडी लगत असून तेथे कारशेडची भिंत उभी केल्याने शेतकऱ्यांना आपल्या शेतावर जाण्यास सहा किलोमीटरचा फेरा पडणार आहे ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. प्रकल्पाचे काम जोमात सुरू असुन भविष्यात यामुळे ग्रामस्थांसह शेतकरी विद्यार्थी यांच्या त्रासात भर पडणार आहे.बुलेट प्रशासनाने या समस्यांकडे तातडीने लक्ष द्यावे अशा सुचना आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याची माहिती देवानंद थळे यांनी दिली.

**भरोडी गावाला जोडणार मुख्य रस्ता ग्रामपंचायतीला कोणतीही पूर्व सूचना न देता खोदून कच्च्या मातीचा रस्ता तयार करून दिला आहे.पावसाळयात या रस्त्यावर चिखल झाल्याने त्या रस्त्यावरील प्रवास जीवघेणा झाला होता.त्यासाठी बुलेट ट्रेन प्रशासनाने मुख्य रस्ता पुन्हा बनवून द्यावा अशी मागणी सरपंच विलास पाटील यांनी केली आहे.तसेच गावातील बहुसंख्य विद्यार्थी हे शिक्षणासाठी अंजूर गावातील माध्यमिक शाळेत जात असतात.परंतु हा रस्ता कारशेडच्या भिंतीमुळे बंद होण्याने विद्यार्थ्यांना सुद्धा मोठा वळसा घालून शाळेत जावे लागणार आहे त्यामुळे बराच वेळ वाया जाऊन विद्यार्थ्यांची पायपीट होणार आहे. या रस्त्यावर अवजड वाहनांची वर्दळ वाढ होईल आणि त्यामुळे अपघात घडू शकतात अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली असुन एकनाथ शिंदे यांनी याबाबत लक्ष द्यावे अशी मागणी करण्यात आली आहे.**

# जिल्हा परिषद सदस्य पदासाठी सुरेश बांगर एक आश्वासक चेहरा



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीचे बिगुल कधीही वाजू शकतात. त्यादृष्टीने सध्या अनेक ईच्छूक उमेदवार तयारीला लागले आहेत.

मुरबाड तालुक्यातही अनेक ईच्छूक उमेदवार पंचायत समिती व जिल्हा परिषद सदस्य होण्यासाठी तयारीला लागले आहेत.मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांच्या अत्यंत जवळचे व विश्वासू समजले जाणारे सहकारी म्हणजे सुरेश नारायण बांगर. भुवन मधील एका सामान्य कुटुंबातून उच्च शिक्षण बि. एस. सी. बीएड्चे पर्यंत घेऊन कळवा येथे एका नामांकित संस्थेत काही वर्ष ज्ञानदानाचे काम केले.तद्नंतर समाजसेवेचे गुण व तळमळ अंगी असल्याने व मानव सेवा हीच ईश्वर सेवा समजून भुवन ग्रामपंचायतीचे प्रथम उपसरपंच, सरपंच ते बाजार समिती संचालक अशा विविध पदावर काम करून जनसेवा करण्याचे काम ते अगदी जोमाने आजही करत आहेत.

त्यांच्या मानवसेवा सामाजिक संस्थेच्या माध्यमातून त्यांनी विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत.तालुक्यातील सामाजिक प्रबोधन करणारे किर्तनकार, प्रवचनकारांचा भव्य सन्मान सोहळा, दुर्लक्षित धवलारिण मातांचा भव्य सन्मान सोहळा तसेच तालुक्यातील छोटे मोठे उद्योग धंदे करून देशाच्या प्रगतीत आर्थिक हातभार लावणारे कुशल कारागिरांचा सन्मान सोहळा आमदार किसन कथोरेंच्या वाढदिवसा निमित्त साजरे करून एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. दरवर्षी शेकडो आदिवासी माता भगिनींना न विसरता भाऊबिजेच्या निमित्ताने साडीचोळी देऊनअनेक आदिवासी महिलांना आपला हक्काचा भाऊ मिळाला आहे.

साधी राहणी उच्च विचारसरणी असणारे व्यक्तिमत्व म्हणजे सुरेश नारायण बांगर. तालुक्यातील प्रत्येकाच्या सुख दुखात सहभागी होणारे सर्वांना हवेहवेसे वाटणारे सदैव हसतमुख व्यक्तिमत्व सुरेश बांगर यांच्या सारखा एक हुशार, अनुभवी,आश्वासक चेहरा जर जिल्हा परीषदेत निवडून गेला तर निश्चितच त्या विभागाला न्याय देतील तेथील तळागाळातील तसेच सर्व जाती धर्मातील लोकांचे प्रश्न नक्कीच सोडवतील यात तिळमात्र मात्र शंका नाही.

# एसटी महामंडळाकडून मुंबईतील कर्मचाऱ्यांची असुविधा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई** : एसटी बससेवा देणाऱ्या चालक व वाहकाला रात्रीच्या वस्तीच्या ठिकाणी राहताना असुविधा होत असल्याने त्यांचे हाल होत आहेत. त्यातच एसटी महामंडळाकडून मुक्कामी जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना थंडीत वूलन ब्लॅकेट देण्यात येत होते, मात्र दोन वर्षांपासून चादर देणे बंद झाल्यामुळे कर्मचाऱ्यांना हुडहुडी भरत आहे. मुंबईतून ग्रामीण भागात जाणाऱ्या १७ पैकी अनेक गावात सोयी-सुविधांची वानवा आहे.

राज्यात थंडीचा कडाका वाढला आहे. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्रात थंडी वाढली असून, शेकोट्या पेटू लागल्या आहेत. गेल्या काही दिवसांपासून तापमानात मोठी घट झाली, तर पुढील काही दिवस तापमानात आणखी घट होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. राज्य परिवहन महामंडळ आजही अहोरात्र प्रवाशांना योग्य सुविधा देत आहेत. यासाठी चालक, वाहक हे इमाने इतबारे काम करतात. एसटी बस ही गावागावात शेवटच्या ठिकाणापर्यंत प्रवाशांना त्यांच्या इच्छितस्थळी सोडण्याची सुविधा देत असते. चालक व वाहक हे खेडेगावात शेवटची बस घेऊन जाऊन त्या ठिकाणी रात्रीचा मुक्काम करत असतात.

शेवटच्या स्थानकावर रात्रीच्या वस्तीला गेलेल्या चालक व वाहकाला वस्तीच्या ठिकाणी बस सोडून दुसरीकडे जाऊन आराम करण्याची सुविधा मिळत नाही. त्यामुळे चालक व वाहकाला एसटीमध्ये आराम करावा लागतो. एसटी बसमध्ये झोपत असले तरी मच्छरांचा त्रास, थंडी वाजते. अशा परिस्थितीत चालक, वाहक यांना रात्र काढावी लागते. स्वच्छतागृह नसल्याने उघड्यावर जावे लागते. अंघोळीची सोय नसते. त्यामुळे कर्मचाऱ्याला ड्युटी संपेपर्यंत तसेच काम करावे लागते.

रात्री वस्तीला असलेल्या गावातील ग्रामपंचायत प्रशासनाने चालक-वाहकांची राहण्याची सोय करणे गरजेचे असते, पण त्याकडे दुर्लक्ष होत असून, या असुविधेकडे एसटी प्रशासन तसेच स्थानिक प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे.

# पेण-खोपोली महामार्गावर भीषण अपघात

## दोन जीवलग मित्रांचा मृत्यू ■ पेण शहरात शोककळा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : पेण खोपोली महामार्गावरील गणपतीवाडी गावच्या स्टॉप जवळ हॉटेल सौभाग्य इन गेट समोर झालेल्या अपघातात पेण शहरातील निलेश किरण पाटील(वय २२) नंदीमाळ नाका आणि वरद अमित सुतार(वय१९) राहणार परीटआळी येथील दोन तरुण मृत्यू झाल्याची घटना बुधवार 19 नोव्हेंबर रोजी घडली. या घटनेने संपर्ण पेण शहर हादरला आहे.

दोन मित्र तरुण गाडी नंबर MH 06 CT 8934 या BMW स्पोर्ट्स या बाईकवरून जात असताना त्यांचा अपघात झाला. त्यांना त्वरित पेण उपजिल्हा रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित करण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच पेण पोलिस घटनास्थळी पोहचले त्यांनी संपूर्ण माहिती घेतली परंतु अपघाताचे कारण अजून स्पष्ट झाले नाही. सदर अपघाताची नोंद पेण पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. या अपघातात दोन तरुण जिवलग मित्र गमावल्याने संपूर्ण शहरात शोककळा पसरली आहे.

# निवडणूक संदर्भात कायदा सुव्यवस्थेबाबत पोलीस निरीक्षकांचे कोसले ग्रामस्थांना मार्गदर्शन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : जिल्हा परिषद व पंचायत समिती खडवली गट व बेहरे गणामध्ये को सले गावामध्ये निवडणूकीच्या अनुसंघाने विलास पाटील (पोलीस पाटील )व सरपंच दिलीप पालवी यांच्या अध्यक्षतेखाली कल्याण ग्रामीणचे टिटवाळा पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक पंकज गिरी साहेबांच्या मार्गदर्शन खाली सभा पार पडली. या सभेमध्ये गावातील ग्रामस्थांचा व नवतरुण मतदारांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. निवडणूक दरम्यान गावांमध्ये कुठलाही अनुचित प्रकार घडू नये व कायदा सुव्यवस्था अबाधित राखून कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची प्रत्येक नागरिकांनी व ग्रामस्थांनी काळजी घेतली पाहिजे असे गिरी साहेबांनी ग्रामस्थांना आव्हान केले. या सभेमध्ये गावातील नव तरुणांबरोबर ग्रामपंचायत सदस्य, सर्व पक्षांचे पदाधिकारी, जेष्ठ नागरिक,तंटामुक्त अध्यक्ष ह. भ. प. विलास महाराज पालवी,शेतीनिष्ठ शेतकरी ग्रीन डायमंड कंपनीचे अध्यक्ष श्रीराम पालवी त्याचबरोबर सामाजिक कार्यकर्ते,पत्रकार, वयोवृद्ध नागरिक उपस्थित होते. नवतरुण मतदारांचे गिरी साहेबांच्या हस्ते कौतुक व जबाबदारी समजावून सांगून त्यांचे अभिनंदन केले. सदाशिव भोईर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून सर्वांचे ग्रामस्थांच्या वतीने आभार मानले. प्रतिक्रिया- पोलीस निरीक्षक (टिटवाळा पो. स्टे.) पंकज गिरी साहेब निवडणुकीमध्ये नवतरुणाचा सहभाग पाहता व घडणाऱ्या गुन्ह्यांना आळा बसविण्यासाठी निवडणुकीपूर्वी प्रत्येक गावामध्ये मार्गदर्शन द्वारे कायदा सुव्यसुव्यवस्था आबादित राखण्यासाठी पोलिसांचा प्रयत्न आहे

# भाजपचे सुरेश भोईर व प्रदिप भोईर यांचा शिवसेना उबाठा गटात प्रवेश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**टिटवाळा :** भाजपचे माजी नगरसेवक व महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य सुरेश भोईर तसेच कल्याण जिल्हा सचिव प्रदिप भोईर यांनी भाजपला रामराम ठोकून शिवसेना पक्षप्रमुख उबाठा उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व स्विकारुन शिवसेनेत प्रवेश केला आहे,मुंबई मातोश्री येथील कायैक्रमात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते माजी नगरसेवक सुरेश भोईर व जिल्हा सचिव प्रदिप भोईर, व्यापारी मंडळाचे अध्यक्ष प्रतिक भोईर,अक्षय भोये, हनुमान भोईर,अरुण तिवारी,रिजेन्सी सवैम उपाध्यक्ष कवै मॅडम यांनी प्रवेश केला आहे सन्मानित करण्यात आले,यावेळी उपनेते विजय साळवी, जिल्हा प्रमुख ॲड अल्पेश भोईर, युवा सेना जिल्हा प्रमुख भुषण जाधव, शहर प्रमुख बाळा परब,



उपशहप्रमुख प्रमुख किशोर शुक्ला,जिल्हा संघटक रेखा पष्टे, राजलक्ष्मी अंगारखे, प्रथमेश पुणयाथी, प्रविण भोईर, दिलीप पातकर, रिक्षा संघटनेचे अध्यक्ष बाळा भोईर,यांच्या सह आदि उपस्थित होते, शिवसेना पक्षात प्रवेश केलेले प्रदिप भोईर यांनी सांगितले की माझे वडिल माजी नगरसेवक सुरेश भोईर हे जवळपास बावन वर्ष पासून संघापासून तर भाजप पयैत एकनिष्ठ काम केले, त्यांनी दोन नगरसेवक निवडून हि आणले परंतु असे आसतांना त्यानाच डावलले जाते,व दुसऱ्या पक्षातुन प्रवेश केलेल्या कायैकत्याना पुढे केले जाते, म्हणून आम्ही शिवसेनेत जाऱ्याचा निर्णय घेतला आहे असे सांगितले.

# बाल सुरक्षा संदेश प्रदर्शित करणाऱ्या बसगाड्यांचे अनावरण

## नवी मुंबईत बाल सुरक्षा सप्ताह २०२५ ची सुरुवात




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : अर्पणच्या 'बाल सुरक्षा सप्ताह अभियानाला नवी मुंबई महानगरपालिका आणि नवी मुंबई महानगरपालिका परिवहन विभागाने पाठिंबा दर्शवताना, पॉक्सो पकडलेगा अभियानातील बाल सुरक्षा संदेश प्रदर्शित करणाऱ्या १०० एनएमएमटी बसगाड्यांचे अनावरण केले. अर्पण ही जागतिक स्तरावर नावाजलेली स्वयंसेवी संस्था असून बाल लैंगिक शोषणाची समस्या समूळ नष्ट करण्यासाठी समर्पित आहे. यावर्षी लहान मुलांचे लैंगिक शोषण करणाऱ्या व्यक्तींना रोखण्यासाठी अर्पणच्या या अभियानाने एका अभिनव विषयावर लक्ष केंद्रित केले आहेः "जर तुम्ही कोणत्याही मुलाचे लैंगिक शोषण कराल, तर तुम्हाला पॉक्सो पकडेल". पॉक्सो पकडलेगा हा आपल्या अभियानाचा हॅशटॅग असणार आहे. त्यामुळे हा केवळ एक इशारा नसून, बाल लैंगिक शोषण रोखण्याच्या दिशेने उचललेलं प्रभावी पाऊल ठरणार आहे. हे अभियान पॉक्सो कायद्याचे (लैंगिक अपराधांपासून बाल संरक्षण अभियान) अस्तित्व अधोरेखित करून या कायद्याच्या उल्लंघनाचे परिणाम किती भयावह असू शकतात याची जाणीव करून देणार आहे.

**१०० एन एमएमटी बसगाड्यांचे अनावरण**

अभिनेत्री विद्या बालन यांनी या अभियानाला पाठिंबा दर्शवला असून, त्या यंदाच्या बाल सुरक्षा सप्ताहाचे नेतृत्व करणार आहेत. श्वेता कवात्रा, मानव गोहील, अनुप सोनीसारख्या अभिनेत्यांनीसुद्धा या अभियानाला पाठींबा दिला आहे. या कार्यक्रमादरम्यान, बाल सुरक्षा संदेश प्रदर्शित करणाऱ्या एका विशेष एनएमएमटी बसचे अनावरण करण्यात आले. नवी मुंबईमध्ये अर्पणच्या अभियानाचे बाल सुरक्षा संदेश प्रदर्शित करणाऱ्या एकूण १०० एनएमएमटी बसेस कार्यान्वित आहेत. अर्पणच्या संस्थापिका व मुख्य कार्यकारी अधिकारी पूजा तापडिया यांनी सांगितले की "बाल सुरक्षा ही कुणाच्याही भरवशावर सोडून देण्यासारखी गोष्ट किंवा समाजातील काही निवडक लोकांची जबाबदारी नाही. तर ती आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. पॉक्सोपकडलेगा या अभियानाच्या माध्यमातून आम्ही बाल लैंगिक शोषणाविषयी जनजागृती करण्याचे ध्येय ठेवले असून, यानिमित्ताने देशातील नागरिकांना मुलांच्या सुरक्षेप्रती सजग बनवले जाणार आहे."

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A. | B.Com. | B.Sc. CHEMISTRY | B.Sc. MATHS | BAF | BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. HISTORY

Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111

ठाणे ■ शनिवार
२२ नोव्हेंबर २०२५
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता



# श्रीराम कृष्ण सेवा ट्रस्ट कल्याण तर्फे गरजूंना अन्न धान्य व ब्लॅंकेट वाटप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याणच्या श्रीराम कृष्ण सेवा ट्रस्ट तर्फे दर महिन्याला गरीब गरजू लोकांना अन्नधान्य वाटप करण्यात येते. कल्याण पश्चिम शहरात गेली ३५ वर्ष हा उपक्रम चालू असून अनेक गोरगरीब गरजूं या योजनेचा लाभ घेत असतात महिन्यातून एकदा हे धान्य वाटप केलं जातं. त्याचबरोबर रोज दुपारी भुकेल्या लोकांना जेवण दिले जाते. आधारवाडी येथे अन्नक्षेत्र असून याठिकाणी हे उपक्रम राबविले जातात.

गुरूवारी झालेल्या या उपक्रमात माजी



नगरसेवक श्रेयस समेळ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून त्यांच्या हस्ते गरजु लोकांना अन्नधान्य व ब्लेन्केट वितरण करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे संचालक जसू चंदाराणा, विनु तन्ना, छबील कारिया, मितुल देसाई, विष्णूकुमार चौधरी, भिखू कारीया, राजू विठलानी, राजीव चंदाराणा, तुषार दाणी, रवी चौधरी, दयाल सजनानी, नटु खिमानी, वंश चंदाराणा, मोनिश चंदाराणा आदी मान्यवरांच्या हस्ते अन्नधान्य सह ब्लेन्केट वितरण करण्यात आले. याप्रसंगी जिगीश बारोट यांनी वितरणासाठी ब्लेन्केट दिल्या बदल त्यांचे आभार मानले. ज्या कोणाला या अन्न क्षेत्राच्या सेवा कार्यामध्ये सहकार्य करायचे असल्यास सहकार्य करण्याचे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. संपर्क : 9320301501, 9322403819

# प्रभाग 9 च्या विकासासाठी कॉंग्रेस कमिटी सरचिटणीस पुन्हा रिंगणात



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** :महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे माजी नगरसेवक एडवोकेट नवीन सिंग यांनी प्रभाग क्रमांक 9 मधून आगामी निवडणुकीत उमेदवारी लढवण्याची अधिकृत घोषणा केली आहे. “प्रभागाचा विकास आणि नागरिकांची सोय हा माझ्या राजकारणाचा केंद्रबिंदू आहे,” असे ते म्हणाले.

त्यांच्या कार्यकाळात रस्ते, पाणीपुरवठा, गटार व्यवस्थापन, सार्वजनिक सुविधा, शाळा-सुविधा, ज्येष्ठ नागरिकांसाठी उपक्रम, महिला बचतगटांना मदत, तसेच युवकांसाठी रोजगार मार्गदर्शनाचे अनेक उपक्रम राबविण्यात आले होते. प्रभागातील अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यात त्यांनी सक्रिय भूमिका बजावली असल्याचे नागरिकही सांगतात.

**सध्याची राजकीय परिस्थिती लक्षात घेता त्यांनी नागरिकांना स्पष्ट संदेश दिला—“आज अनेक जण केवळ स्वार्थासाठी पक्षांतर करत आहेत. पण माझी भूमिका नेहमीच स्पष्ट राहिली आहे—नागरिकांचा विकास, आणि प्रभागाचा विकास. त्यामुळे आपण सर्वांनी आपल्या मताचा योग्य वापर करून प्रामाणिक व काम करणाऱ्या उमेदवाराला निवडून द्यावे.”**

**यावेळी त्यांनी प्रभागातील महत्त्वाच्या नव्या योजनांची रूपरेषाही सादर केली—**

- प्रत्येक वसाहतीत पिण्याच्या पाण्याचा दर्जा आणि तासवार पुरवठा सुधारणा
- अंतर्गत रस्त्यांचे मजबुतीकरण व नवीन सिमेंट रस्ते
- जलनिकासी व गटार प्रणाली अधिक आधुनिक करणे
- महिला व युवकांसाठी कौशल्य विकास केंद्र
- वरिष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी व समाजोपयोगी कार्यक्रम
- क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांना गती देण्यासाठी सुविधा केंद्र

“प्रभाग 9 ला आदर्श प्रभाग बनवणे हा माझा संकल्प आहे,” असे सांगत त्यांनी जनतेची साथ मागितली .

# ठाणे जिल्ह्यातील खाजगी जमिनीवर एम सँड उत्पादन करण्यास इच्छुक अर्जदारांनी अर्ज करणे बंधनकारक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडील शासन निर्णय क्र. गोखनी-10/0325/प्र.क्र.80/ख-2, दि.23 मे 2025 अन्वये राज्यातील विविध बांधकामासाठी नैसर्गिक वाळूला पर्याय म्हणून विकास कामांमध्ये कृत्रिम वाळूचा (M-SAND) वापर करण्याबाबत शासनाने धोरण निश्चित केले आहे. त्यानुषंगाने महसूल व वन विभागाकडील दि.17 जुलै 2025 व दि.27 ऑक्टोबर 2025 रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार व दि.27 ऑक्टोबर 2025 व दि. 03 नोव्हेंबर 2025 रोजीच्या शासन पत्रान्वये कृत्रिम वाळू धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

कृत्रिम वाळू धोरणाची (M-Sand Policy) प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी ठाणे जिल्ह्यामध्ये 100 टक्के एम सॅण्ड क्रशर युनिट बसविण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून खाजगी जमिनीवर एम सॅण्ड उत्पादन करण्यास इच्छुक अर्जदारांनी वरील नमूद शासन निर्णय व पत्रात नमूद कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज रेतीगट शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे सादर करणे बंधनकारक आहे.

एम सँड युनिटधारक तीन प्रकारचे असणार आहेत.

अ. मंजूर खाणपट्टा असलेले (Quarry lease), ब. तात्पुरता परवानाधारक (Quarry Permit), क. कोणत्याही प्रकारचा खाणपट्टा नसलेले.

100 टक्के एम सँड (कृत्रिम वाळू) उत्पादित करु इच्छिणाऱ्या व्यक्ती/संस्थेकडून योजनेच्या सवलती मिळण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज करतेवेळी खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

1. आवश्यक कागदपत्रे - 1. मिळकतीचा चालू 7/12 उतारा, फेरफार.
2. वैयक्तिक अर्ज असल्यास अर्जदार यांचे आधारकार्ड, पॅनकार्ड.
3. संस्था असल्यास त्याबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र / संस्थेबाबतची कागदपत्रे.
4. उद्योग आधार नोंदणी प्रमाणपत्र.
5. रु. 500/- इतकी अर्ज फी.
6. युनिटमधून 100% एम सॅण्ड उत्पादित करण्याबाबतचे रु.100/- च्या बंधपत्रावर हमी.
7. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडील Consent to Establish दाखला.
8. एम सँड उत्पादनासाठी उपलब्ध होणारा दगड कोणत्या खाणपट्टयातून व इतर स्त्रोतांतून (Source) आणण्यात येणार आहेत, त्या खाणपट्टयाचा अथवा स्त्रोतांचा तपशील. (खाणपट्टा धारकांचे अथवा तात्पुरता परवानाधारकांचे संमतीपत्र).
9. एम सँड युनिट बसविण्यात येणार आहेत अशा क्षेत्राबाबत संबंधित नियोजन प्राधिकरणाकडून त्याबाबतचा वापर अनुज्ञेय आहे अगर कसे? याबाबतचे नाहरकत प्रमाणपत्र.

वरील नमूद केल्याप्रमाणे एम सँड धोरणाचा लाभ घेण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील (अंबरनाथ तालुका वगळून) सर्व इच्छुक व्यक्ती/संस्था यांनी वरीलप्रमाणे दिलेल्या सूचनेनुसार परिपूर्ण अर्ज आवश्यक कागदपत्रांसह या कार्यालयात ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या 30 दिवसात सादर करण्याची नोंद घ्यावी. तसेच यापूर्वी संबंधित एम सॅण्ड उत्पादन करणाऱ्या युनिटधारकाने महाखनिज या संगणक प्रणालीवर अर्ज केला असल्यास त्यांनी पुन्हा नव्याने जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे. एम सॅण्ड (कृत्रिम वाळू) च्या अर्जाबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा खनिकर्म अधिकारी, ठाणे, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे संपर्क साधावा, असे ठाणे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी कळविले आहे.

एम सँड युनिट स्थापन करु इच्छिणाऱ्या अंबरनाथ तालुक्यातील व्यक्ती/संस्था यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर अर्ज करावेत, असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# नगरपरिषद निवडणूक जाहिरातींच्या प्रमाणिकरणासाठी समिती गठित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : नगरपरिषदेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त, निर्भय, पारदर्शक आणि प्रत्येक राजकीय पक्ष व उमेदवाराला समान संधी मिळेल अशा वातावरणात घडवण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने माध्यम क्षेत्रातील सर्व नियमांची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने व्यापक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

निवडणूक प्रक्रियेत माध्यमांचा गैरवापर थांबवणे, मतदारांना दिशाभूल होऊ न देणे आणि जाहिरातींमधील आचारसंहितेचे पालन बंधनकारक ठेवण्यासाठी जिल्हा व राज्यस्तरावर माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समित्या तात्काळ कार्यान्वित केल्या आहेत.

जिल्हास्तरीय समिती जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आली असून, जिल्हा पोलीस अधीक्षक, उपजिल्हाधिकारी (साप्रवि), संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, संबंधित तहसिलदार आणि मुख्याधिकारी हे या समितीचे सदस्य आहेत. जिल्हा माहिती अधिकारी हे सदस्य सचिव म्हणून कार्यरत असतील.

उमेदवार तसेच राजकीय पक्षांना कोणतीही निवडणूक संबंधित जाहिरात इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर प्रसारित करण्यापूर्वी पूर्वप्रमाणन घेणे 'अनिवार्य' आहे. भारतीय संविधान व कायद्यांना विरोध करणारा मजकूर, धर्म, जात, भाषा, लिंग किंवा पेहरावावर आधारित द्वेष निर्माण करणारे संदेश, प्रार्थनास्थळांचे फोटो किंवा व्हिडिओ, हिंसेला किंवा अस्थैर्याला प्रोत्साहन देणारे मजकूर, व्यक्ती, संस्था किंवा न्यायालयाची बदनामी करणारी सामग्री, देशाच्या सार्वभौमत्वाला बाधा पोहोचवणारे विधान, परकीय देशांबद्दल अवमानकारक विधाने, संरक्षण दलाचे फोटो किंवा व्हिडिओ, राजकीय नेत्यांवर खोटे आरोप, व्यक्तीच्या खासगी आयुष्यात अनुचित हस्तक्षेप, अनैतिक, अश्लील किंवा नीतिनियमांच्या विरुद्ध सामग्री अशा स्वरूपाच्या जाहिरातींना अनुमती मिळणार नाही आणि त्यांना पूर्वप्रमाणनही प्रदान केले जाणार नाही. जर जाहिरात राजकीय पक्षाने केली असेल, तर ती पक्षाच्या निवडणूक खर्चात नोंदवली जाईल. उमेदवाराने केल्यास, ती उमेदवाराच्या खात्यात दाखविणे बंधनकारक राहील. सोशल मीडियावरील वैयक्तिक मते जाहिरात म्हणून समजली जाणार नाहीत; परंतु आचारसंहिता लागू झाल्यानंतर कोणत्याही पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या लेखी परवानगीशिवाय प्रचार केल्यास ती जाहिरात ठरेल आणि त्यासाठी प्रमाणन आवश्यक राहील. निवडणुकीसाठी अर्ज करताना 10 किंवा त्यापेक्षा कमी स्थानिक संस्थांसाठी जाहिरात करायची असल्यास जिल्हास्तरीय समितीकडे स्वतंत्र अर्ज सादर करावा लागेल. 10 पेक्षा अधिक किंवा राज्यभरासाठी जाहिरात करायची असल्यास राज्यस्तरीय समितीकडे अर्ज करता येईल. जाहिरात प्रसारित करण्यापूर्वी किमान 5 कामकाजाचे दिवस आधी संबंधीत समितीकडे अर्ज करावा लागेल. अर्जाचा नमुना व आवश्यक माहिती निवडणूक निर्णय अधिकारी किंवा समितीच्या जिल्हा माहिती कार्यालयातून उपलब्ध करून घेता येईल. अर्जासोबत जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक प्रत आणि साक्षांकित जाहिरात संहिता जोडणे बंधनकारक आहे. जाहिरातीची कोणतीही देयके धनादेश, धनाकर्ष व ऑनलाईन पद्धतीने अदा करण्यात येतील. अन्य भाषांतील जाहिरातींसाठी मराठी अनुवादित साक्षांकित केलेली प्रत व नोटराईज्ड अनुवाद प्रत जोडणे आवश्यक आहे. मुद्रित माध्यमांतील जाहिराती मुद्रित माध्यमांद्वारे प्रसिध्द करावयाच्या जाहिरातींचे पूर्वप्रमाणन करण्याची आवश्यकता नाही. परंतु, अशा माध्यमातून जाहिरातील प्रसिध्द करताना आचारसंहिता किंवा कोणत्याही कायद्याचे उल्लंघन होता कामा नये. तसेच, इतर प्रत्येक मुद्रित साहित्यावर प्रकाशक, मुद्रणालय, पत्ता, प्रत क्रमांक आणि प्रत संख्या नमूद असणे बंधनकारक आहे. उल्लंघन आढळल्यास प्रेस अॅक्टसह लागू प्रचलित कायद्यांनुसार कारवाई होईल.

संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूक जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, समाजमाध्यमे आदी माध्यमांद्वारे कोणत्याही प्रचारविषयक जाहिराती देता येणार नाहीत, याची संबंधितांनी नोंद घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# वासिंद - गेरसा मार्ग खड्ड्यात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : वासिंद - गेरसा मार्गे शेरा या रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने ये-जा करणाऱ्या प्रवासी नागरिकांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे.

वासिंद भातसा नदीवर असलेल्या गेरसा पूलाकडून शेरा -अंबर्जे व गेरसा टिटवाळा भागाकडे जाणाऱ्या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्याने या रस्त्यावरून वाहतूक करताना वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागते सदरचा हा मार्ग जवळपास 20 ते 25 खेड्यांना जोडणारा असून आजूबाजूच्या जवळपास बारा ते पंधरा गावांमधील ग्रामस्थांची रोजची ये जा चालू असते तर शहापूर, मुरबाड व



कल्याण तालुक्यातील नागरिकांना कामानिमित्ताने सातत्याने या मार्गाचा वापर करावा लागतो परंतु सध्या रस्ता नादुरुस्त बनल्याने येथील वाहनचालक व प्रवासी-नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. तर खड्डे चुकवताना तारेवरची कसरत करावी लागते या जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमुळे अनेक वाहनांचा नुकसानी होताना दिसत आहे तसेच काही वाहनचालक या खड्ड्यांमध्ये पडून जखमी झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत तरी लवकरात लवकर या रस्त्याची दुरुस्ती करून वाहन चालक, प्रवासी व नागरिकांना होणारा त्रास दूर करावा अशी मागणी होताना दिसत आहे

सदर, ऐन गणेशोत्सव काळात या रस्त्यावरील खड्डे बुजवण्यात आले होते परंतु पावसामुळे खडी बाहेर येऊन रस्त्यावर खड्डे पडून रस्ता नादुरुस्त बनला असल्याचे गेरसे येथील सामाजिक कार्यकर्ते राजेश गायकर यांनी म्हटले आहे. दरम्यान या रस्त्यावर लवकरात लवकर दुरुस्ती करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

# क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्रात विबग्योर राईजच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : विबग्योर राईज, कल्याणच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक आणि कला-क्रीडा क्षेत्रांमध्येही सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करत यश मिळवले आहे. शैक्षणिक ऑलिम्पियाडमधील तिसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्यांचे चमकदार यश शाळेच्या विद्यार्थी-केंद्रित शिक्षणाची बांधिलकी दर्शवते. तिसऱ्या इयत्तेतील आरव मुलींटी याने महाराष्ट्र राज्याच्या ‘स्पेलक्वेस्ट’ स्पर्धेत राज्य विजेता होण्याचा मान पटकावला, तसेच त्याने एसओएफ आंतरराष्ट्रीय गणित स्पर्धेत पहिले पारितोषिक आणि विज्ञान स्पर्धेत ९ वा क्रमांक मिळवला.

महाराष्ट्र स्पेलक्वेस्टमध्ये ग्रेड ३ च्या दिग्गजांमध्ये ९७.८६% गुणांसह तरुण दैविक मखीजा आणि ९७.१४% गुणांसह वासुदेव अनीश यांचा 'स्टार परफॉर्मर्स' मध्ये समावेश होता. वासुदेव अनीश याने स्पेलक्वेस्ट राष्ट्रीय स्तरावरील अचीव्हरमध्ये मेरिट श्रेणीत स्थान मिळवले. विबग्योर राईज, कल्याणचे प्राचार्य, दुष्यंत बाफना म्हणाले, “आमच्या विद्यार्थ्यांची प्रत्येक उपलब्धी ही त्यांची जिज्ञासा, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शनाचा उत्सव आहे. आमच्या शाळेची आधुनिक पायाभूत सुविधा, नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम आणि समर्पित शिक्षक हे सर्व एकत्र येऊन प्रत्येक मुलांनां शैक्षणिक, सर्जनशील आणि वैयक्तिक स्तरावर त्यांची पूर्ण क्षमता गाठण्यास मदत करते.”

विबग्योर राईज, कल्याणच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रातही चमकदार कामगिरी करत जिल्हास्तरीय ज्युडो चॅम्पियनशिपमध्ये पदके जिंकली आहेत. आठवीतील विद्यार्थीनी देवयानी पाटील आणि यती सावंत यांनी ठाणे जिल्हा ज्युडो चॅम्पियनशिपमध्ये रौप्यपदक पटकावले, तर यक्षित अग्रवालने कांस्यपदक जिंकले. सांस्कृतिक उपक्रमांमध्येही विद्यार्थ्यांनी आपली प्रतिभा दाखवली. सातवीच्या विद्यार्थ्यांनी जामनबाई नरसी आंतरराष्ट्रीय शाळेच्या महोत्सवात 'डुओ ड्रामा' मध्ये तिसरे पारितोषिक मिळवले, तर दुसरीच्या विद्यार्थ्याने डॉन बॉस्को हायस्कूलमध्ये आयोजित 'गोष्ट सांगणे' स्पर्धेत दुसरे सर्वोत्तम स्थान मिळवले. कल्याणमधील एक अग्रगण्य शाळा म्हणून विबग्योर राईज, आधुनिक पायाभूत सुविधा, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि शैक्षणिक उत्कृष्टतेवर व सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करून एक समग्र शिक्षण वातावरण प्रदान करत आहे.

# फ्लॉक लीडर, गाईड कॅप्टन, कब मास्टर व स्काऊट मास्टर प्राथमिक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : शिक्षण कार्यालय प्राथमिक व माध्यमिक विभाग, जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळांना महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट आणि गाईड मुंबई व ठाणे भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा कार्यालय ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे ठाणे भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा संस्था ठाणे, गावदेवी मैदाना जवळ, नौपाडा, ठाणे येथे दिनांक 10 ते 16 डिसेंबर 2025 या कालावधीमध्ये फ्लॉक लीडर, गाईड कॅप्टन प्राथमिक प्रशिक्षण शिबिराचे तसेच दिनांक 16 ते 22 डिसेंबर 2025 या कालावधीमध्ये कब मास्टर व स्काऊट मास्टर प्राथमिक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या शिबिरासाठी 21 वर्ष पूर्ण असलेल्या अप्रशिक्षित शिक्षक/ शिक्षिका यांची निवड करण्यात आलेली आहे. निवड झालेल्या शिक्षकांना ऑनड्युटी कार्यमुक्त करावे. तरी सर्व शाळांनी या प्रशिक्षण शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन स्काऊट गाईड जिल्हा कार्यालय ठाणे संस्थेच्या वतीने करण्यात येत आहे.

# दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करून तातडीने शास्त्रोक्त विसर्जन करावे ! - हिंदु जनजागृती समितीची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

गणेशोत्सव संपून तीन महिने होत आले तरी नवी मुंबई महानगरपालिकेने भाविकांकडून गोळा केलेल्या हजारो श्रीगणेशमूर्तींचे अद्याप विसर्जन केलेले नसल्याचा संतापजनक प्रकार उघड झाला आहे. या मूर्ती पार्किंग वा इतर ठिकाणी धुळ खात पडून राहिल्या असून हा हिंदूंच्या धार्मिक भावनांचा स्पष्ट अवमान असल्याची भावना गणेशभक्तांमध्ये निर्माण झाली आहे. या संदर्भात हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र राज्य संघटक श्री. सुनील घनवट यांनी महापालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या कडे लेखी निवेदन देत संबंधित अधिकारी आणि जबाबदारांवर तातडीने कारवाईची मागणी केली आहे. समितीच्या वतीने दिलेले निवेदन अतिरिक्त आयुक्त श्री. सुनील पवार यांनी स्वीकारले आहे.

समितीने सांगितले की, अशाच प्रकारे राज्यातील विविध महानगरपालिकांच्या हद्दीतही श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन न झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे राज्य शासनाने तातडीने हस्तक्षेप करून हिंदूंच्या धर्मभावनांचा विचार करत, संकलित सर्व मूर्तींचे शास्त्रोक्त पुनर्विसर्जन करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी समितीने केली आहे.

नुकत्याच झालेल्या गणेशोत्सवाच्या पहिल्या दिवशीच मुंबई महानगरपालिकेकडून ठाणे जिल्ह्यातील डायघर भागातील डम्पिंग ग्राउंडवर कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळ शेकडो ट्रकभर गणेशमूर्ती टाकण्यात आल्याचा प्रकार घडल्याचे समोर आले होते. तेव्हा ग्रामस्थांच्या आंदोलनानंतर १५० हून अधिक डंपर परताव्यात आले होते. यापूर्वीही पुणे, ठाणे, सातारा आदी जिल्ह्यांमध्ये खाडी, नाले, खदानी आणि जुनी विहिरी अशा अयोग्य ठिकाणी मूर्ती टाकल्याच्या घटना घडल्या आहेत. या सर्व प्रकारांमुळे गणेशभक्तांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. हिंदूंच्या धर्मभावना दुखावल्या गेल्या आहेत.

हिंदु जनजागृती समितीचे श्री. सुनील घनवट यांनी सांगितले की, "श्रीगणेशमूर्तींचे शास्त्रोक्त विसर्जन न होता त्यांचा अपमान होणे हे असह्य आहे. प्रशासनाने हे प्रकरण गांभीर्याने घेतले पाहिजे. पुढील काळात अशा घटना होऊ नयेत, यासाठी विसर्जनानंतर संकलित झालेल्या मूर्तींचे नियोजित पद्धतीने विधीवत विसर्जन केले जावे. तसेच शासनाने हिंदू संघटना, संत, धर्माचार्य यांच्या सल्ल्याने धर्मसंमत व धर्मश्रद्धा जपणारे धोरण ठरवून त्यानुसार अंमलबजावणी करावी. तसेच सध्या ज्या महानगरपालिकांकडे संकलित गणेशमूर्ती आहेत, त्यांचे तातडीने शुद्ध पद्धतीने विसर्जन करण्यात यावे आणि हिंदूंच्या श्रद्धेचा अपमान करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024